

# भूमिका

या देशातील चर्मकार ही एक अत्यंत वेदनामय वस्तुस्थिती आहे. मेलेले जनावरं, त्याचे कातडे आणि त्याचा व्यवसाय हे त्याचे उपजिविकेचे साधन बनल्याने कातडे कमावणे आणि त्याच्या विविध वस्तू तयार करण्याच्या निमित्ताने त्याचा दुर्गंधीशी संबंध आला. या दुर्गंधीने त्याचे अस्तित्वच दुर्गंधित केले. त्याला वर्णव्यवस्थेने शुद्रत्व दिले आणि जाती व्यवस्थेने तर अस्पृश्यच ठरविले.

देशभरातील हा चर्मकार वेगवेगळया नावाने ओळखला जातो. आंध्र, कर्नाटकमध्ये तो मादिगा असतो तर गुजराथमध्ये मोची, रेगर, उत्तर प्रदेशात जाटव व बिहार, मध्यप्रदेशात चमार, महाराष्ट्रामध्ये चांभार, ढोर,मोची, होलार अशा विविध पोट जातींमध्ये विभागलेला. सर्वत्र अस्पृश्य म्हणून नागवलेला आणि स्वातंत्र्य प्राप्तीनंतर अनुसूचित जात म्हणून सोयीसवलतीच्या झुलव्यासंगे हेलकावे खात भरकटत थोडासा प्रकाश, प्रगतीच्या वाटा धुंडाळणारा. आजही उपेक्षित, शोषित, पिडीत अशा या चर्मकाराची लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या 20 ते 23 टक्क्याच्या आसपास असलेली, तरी सुध्दा सत्ता आणि संपत्तीमध्ये वाटा नसलेली निर्धन, बेकार, कारागीर, शेतमजूर, वेठबिगार म्हणून हाल अपेष्टेचे जीवन जगतो आहे.

शेतीप्रधान ग्रामरचनेमध्ये एक बलुतेदार म्हणून त्याची भूमिका होती. ही भूमिका शेतकरी वर्गाला पूरक अशी होती. शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या मोटा त्याने बांधून द्यायच्या, त्याच्या पाळीव प्राण्यासाठी कातडयाचे अलंकार बनवायचे, जमिनदाराची पायताणे तयार करुन द्यायची, जुनी पायताणे सांदून द्यायची असे त्याचे स्वरुप होते. शेतकऱ्याच्या मेलेल्या जनावराचे कातडे सालहिरडा घलून कमवायचे. त्या मोबदल्यात त्याला मोट द्यायची असा तो व्यवहार होता. या कष्टाचा मोबदला पैशामध्ये नव्हे, तर धान्याच्या रुपाने खळयाच्या पाळूला मिळायाचा. कधी सुगिच्या दिवसांत कापणीनंतर पाचुंदयाच्या हिशोबाने ज्वारी / बाजरीच्या पेंढया मिळायच्या बलुतेदाराकडे धान्य असायचे पण भाजीसाठी पुन्हा मालकाच्या मळयामध्ये जाऊन भिक मागण्याचे जीणे वाटयाला आलेले.लग्नकार्याला, मौतमार्तिकाला, दुखण्याखुपण्याला, नेहमीच्या कपडयालत्याला पैशासाठी मात्र तो मोताद असायचा. त्याच्या अडीअडचणींच्या काळामध्ये जमिनदार/सावकार त्याचा गैरफायदा घेत.खेडयामध्ये अल्पसंख्यांक असल्याने तो प्रतिकार वाङ्मयामध्ये तो नायक म्हणून कधीच चितारला गेला नाही. याचक /सेवक या पलिकडे त्याचा संदर्भ सापडत नाही. जाती व्यवस्थेने अस्पृश्य ठरवलेला तिरस्करणीय / घाणेरडा म्हणून मात्र विपुल वेळा अपमानित केला गेला.

गुलामीला देखील बंडाचे स्वप्न पडलेच नाही. वेळोवेळच्या कालखंडामध्ये ही जातीबदध समाजव्यवस्ता मोडण्यासाठी त्याने उठाव केला.पण एकाकी झुंज अपयशी ठरुन वेळोवेळी तोच मोडून पडला.बसवेश्वराच्या अनुभव मंडपम मधील विद्वान पंडित हरळय्या चर्मकारच होता. स्वतच्या आंतरजातीय विवाहाच्या निमित्ताने लढावे लागलेले यादवी युदध या देशातील जाती मोडण्याचा पहिला शास्त्रशुदध प्रयत्न होता की ज्यामध्ये हरळय्या व त्यांची पत्नी कल्यनम्मा यांना बलिदान द्यावे लागले.

शुर सेनापती ककय्या यांनी या लढाईमध्ये बाजीप्रभूची भूमिका बजावली.हे उल्लेखनिय तर आहेच परंतू चर्मकारामधील एकजूटीचा तो अभिमानास्पद इतिहास आहे. तो पराभूत झाला हे खरेचं तथापि त्याच्या बलिदानाने येथील जातीअंताच्या प्रक्रियेला विचार दिला हे नाकारता येणार नाही. म्हाइंभटाच्या लिळाचरित्रातील चर्मकारीवरील लिळा, त्या समाजावर पिढयानपिढया होणाऱ्या अन्याय अत्याचाराचा इतिहास आहे. तथापि कर्मविपासकाच्या सिदधांताबरोबर त्याचे शोषण पवित्र झाले. मनुने सांगितलेल्या धर्मशास्त्रामध्ये त्याचे जगणेच हराम केले.

चर्मकार या अतिशुद्राचा जन्मच मुळी अशुभ व अभद्र आहे,ही धर्मशास्त्राने मांडलेली विकृती, शोषकांचे हत्यार झाले. पुर्नजन्माच्या सिध्दांताने शोषण पवित्र केले. या अतिशूद्र समुहावर चर्मकारादी अस्पृश्य जातींवर अन्याय / अत्याचार करणे हा सवर्णांचा हक्क झाला अन् त्यांनी तो निमूटपणे सहन करणे हे कर्तव्य ठरले. त्याला गावकुसाच्या बाहेर ठेवले. या शुद्र समाजाला उपनयनाचा अधिकार नाकारुन पिढ्यानपिढ्या त्याला ज्ञानापासून

वंचित ठेवले. एखाद्या शंबुकाने बंड केले तर त्याला प्राणाचे मोल द्यावे लागले. एकलव्याचे अंगठे कापून गेले. कर्णाची कवचकुंडले हिरावली गेली आणि या सर्व पुराणकथा शुद्रातिशुद्रांसाठी भितीचा डोंगर झाल्या. तो अंधारगुहेत निपचित जनावरांचे जीणे जगू लागला. हा सर्व इतिहास म्हणजे ऐतिहासिक मानवी विकास क्रमातील अत्यंत काळा कालखंड आहे. या देशातील एकूण लोकसमुहाच्या 40 टक्क्यापेक्षा अधिक जीवांच्या मूक आक्रंदनाचा हा इतिहास आहे.

**औद्योगिक क्रांती आणि ज्योतिबा फुले**

औद्योगिक क्रांतीने ग्रामीण कारागीरांचे हातच कापून नेले. मोट नाडे नष्ट झाले, रबर आले, कातड्याच्या चपले ऐवजी स्लीपर / बूट आले. कारागीर बेकार झाले. यंत्राने सुबक सुंदर गतिमान दिले. निर्धन चर्मकार समाज काळाच्या पावलाबरोबर पाऊल ठेवून चालूच शकत नव्हता. शिक्षण नाही म्हणून ज्ञानाचा अभाव, पैसा नाही म्हणून भांडवलाचा अभाव. शेती नाही म्हणून हा कलावंत समाज शेतमजूर होऊन वेठबिगाराचे जीणे जगू लागला. त्याची बलुतेदारी गेली, घास तुकड्याची सोय संपली तो हवालदिल झाला. गाव सोडून शहराकडे वळू लागला. याच कालखंडामध्ये उदार मतवादाच्या प्रचारास या देशामध्ये प्रारंभ झाला. नव्या वैज्ञानिक दृष्टीने शोषणाचा अर्थ कळू लागलाप. शोषणाचे / दारिद्र्याचे संदर्भ उजागर होऊ लागले. जोतिबा फुल्यांनी सांगितले की,

विद्येविन मति गेली । मति विना निती गेली ।
नितिविना वित्त गेले । वित्ताविना शुद्र खचले ।
हे सारे अनर्थ एका अविद्येने केले ॥

हे वास्तव मांडून शुद्रातिशुद्रासाठी शिक्षण प्रसाराचे कार्य हाती घेतले. शहरांमध्ये पोट भरण्यासाठी आलेल्या काहींच्या कानावर ही गोष्ट गेली. एखादा दुसरा शळेमध्ये दाखल होऊ लागला. शिक्षणाने त्याला प्रकाश दिला. लख्ख उजेडात तो भूतभविष्य वाचू लागला. सामाजिक समतेच्या चळवळीमध्ये सहभागी झाला.

**डॉ. आंबेडकरांचा उदय - समतेची चळवळ आणि चर्मकार समाज**

डॉ. आंबेडकरांनी फुलेंच्या विचारांना संघटीत चळवळीचे स्वरुप दिले. उच्च विद्याविभूषित डॉक्टरांनी शुद्रातिशुद्रांच्या / अस्पृश्यांच्या अवस्थेचे शास्त्रीय विश्लेषण मांडले. त्यांची हीनदीन अवस्था करणाऱ्या विचारांनी आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले. जात म्हणजे बंदिस्त वर्ग असून ती जात मोडायची असेल तर जातींची तोंडे खुली करावी लागतील असे केवळ सिध्दांत मांडून डॉ. बाबासाहेब थांबले नाहीत तर जाती अंतासाठी त्यांनी उभी हयात वेचली. सामाजिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक अशा सर्व क्षेत्रांमध्ये लढाई लढली. ते दीनदुबळयांचे बाबा झाले. स्वातंत्र्यापेक्षाही सामाजिक समतेला झुकते माप देणाऱ्या डॉक्टरांना भारतीय राज्य घटनेमध्ये या देशातील तमाम अस्पृश्य वर्गासाठी जास्तीत जास्त सवलतींचे प्राविधान केले. त्यांच्या प्रत्येक लढ्याने समाजक्रांतीच्या प्रवासासाठी मार्गदर्शक योगदान दिले आहे.

आज बौध्द समाज जेवढ्या प्रमाणामध्ये डॉ. आंबेडकरांच्या चळवळींमध्ये सक्रिय झाला, दुदैवाने तेवढया मोठया प्रमाणामध्ये देशातील चर्मकार समाज सहभागी झाला नाही. बलुतेदारी समाज व्यवस्थेने आसामदाराशी पिढयानपिढया जोडली गेलेली नाळ तटकन् तोडून तो खेडयापासून अलग झाला नाही.

या समाजातील अनेक जाणकारांनी डॉ. बाबासाहेबांच्या चळवळींमध्ये झोकून दिले. स्व.नारायणराव शिवतरकर, स्व.बापूसाहेब उर्फ पा.ना. राजभोज यांचा या संदर्भात जरुर उल्लेख करावा लागेल. तथापि सर्व चर्मकारांना आकृष्ट करु शकेल असे मात्र काही घडले नाही. या उलट संत देवजीबाबा, संत रोहिदास महाराज, गोविंद महाराज श्री गोंदेकर, संत संताबाई यांच्या शिकवणुकीने चर्मकार समाज मोठ्या प्रमाणावर भागवत भक्तीमध्ये विलीन झाला. त्याच्यामध्ये सात्वीक व सहनशिल वृत्ती मोठ्या प्रमाणावर निर्माण झाली. त्यांचे शोषण व पिळवणूक यामुळे थांबली नाही. तरी देखील शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा ही डॉ. बाबासाहेबांची त्रिसूत्री त्याच्यामध्ये चेतना निर्माण करु शकली नाही. अलिकडच्या शहरांमध्ये संघटीत झालेल्या गटई कामगारांनी एखादे उपोषण केल्याची नोंद आहे. तथापि चर्मकरांचा मोर्चा, एखाद्या प्रश्नावर त्याने रस्त्यावर येऊन केलेली सनदशीर लढाई भारतीय लोकशाहीने अजून बघितलेली नाही. स्वातंत्र्याबरोबर प्राप्त झालेल्या हक्कांचा आधार मिळून ही तो आजही निराधार आहे. खेड्यापाडयामध्ये आजही तो हलाखीचे जीणे जगतो आहे. मोठमोठया शहरांमधून झोपडपट्टीमध्ये किड्यामुंग्यांसारखा राहतो आहे आणि या अवनतीचे एकमेव कारण त्याला कोणी संघटीत केले

नाही. संघर्ष करायचे शिकविलेच नाही.

या देशातील बलदंड दलित चळवळीने देखील राजकीय हेराफेरीमध्ये सर्वांना सोबत घेऊन जाण्याचे महत्कार्य करण्याऐवजी आपआपसांत भांडून स्वतःचीच शकले करुन घेतली. डॉ. बाबासाहेबांच्या पश्चात देखील येथिल दलित नेतृत्वाने वैश ?विक भूमिका मांडण्याचा प्रयत्न केला. तथापि व्यवहार मात्र वेगळाच राहिला. चर्मकार समाजातील चळवळीमध्ये सामिल झालेल्या कार्यकर्त्यांना अनुयायी होण्याशिवाय दुसरी भूमिका वाट्याला आली नाही. चर्मकाराचे प्रश्नासाठी या संघटीत समुहाने कुठलेही लढे कधीच उभारले नाहीत. सर्व शोषित / असंघटीत समुहाचे नेतृत्व करीत असतांना त्यांच्या व्यथा / वेदनांना प्रश्नांचे स्वरुप आलेच नाही. त्यामुळे चर्मकार समाजातील अशा शिक्षित, क्रियाशील कार्यकर्त्यांमध्ये केवळ निराशेचीच भावना निर्माण झाली. कार्यकर्त्या वर्गाने मतपेट्यांच्या नादी लागून असंघटीत चर्मकारांची उपेक्षाच केली. त्यामुळे या समुहगटातून उमलणाऱ्या नेतृत्वाची वाणवाच राहिली. या राज्यातील सत्ताकरण महाजनांकडून बहुजनांकडे जरुर हस्तींतरित झाले परंतू त्यांच्यातील धनदांडग्यांनी स्वतःचे हितसंध सांभाळीत तत्वांची पायमल्लीच केली. त्याचा अपरिहार्य परिणाम म्हणून त्यांचा मानवीय चेहरा लोपला. मुठभर घराण्यांच्या पलीकडे ही राजसत्ता जाणार नाही, याची खबरदारी घेण्यातच त्यांनी धन्यता मानली. सत्तेच्या मस्तवालीपुढे खेडयापाडयातील दीनदलितांचे न्यायासाठी आक्रंदने केवळ व्यर्थ ठरले.

अशा हतबल कालखंडामध्ये चर्मकार समाजाला बदलत्या राजकीय परिस्थितीने सत्तेमध्ये वाटा मिळाला. सत्तेमधील सहभाग म्हणजे तुमच्या आशा / आकांक्षेला मुर्त स्वरुप मिळण्याचे स्वप्न असते. प्रकाशाचे स्वप्न कधीच वाट्याला न आलेल्या चर्मकारांच्या आनंदाला त्यामुळे पारावारच राहिलेला नाही. विधानसभेमध्ये आठ आमदार, त्यापैकी एक कॅबिनेट मंत्रीपद ! आणि तीन महामंडळांची अध्यक्षपदे !! अवघ्या महाराष्ट्रातील चर्मकार भवाबहिणींची रिघ मुंबईला लागली. जिल्ह्या – जिल्ह्यामध्ये, तालुकापातळीवर समाज एकत्र येऊन या आमदार / नामदारांचे सत्कार करु लागला. त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद वाचताना, दीर्घकाळ सुप्त राहिलेल्या त्यांच्या दुःखाच्या ओव्या वाचायला मिळाल्या. त्यांच्या सहनशील व असंघटीत वृतीने त्यांचे शोषण केल्याची जाणीव जागी झाल्याचे जाणवले. आता संघटीत होऊन प्रश्न सोडवून घेण्याची त्यांच्यातील तगमग अस्वस्थ करु लागली. एका बाजूला आनंद अन् दुसऱ्या बाजूला प्रश्नांचा पाऊस ! जीवनमरणाच्या प्रश्नांनी मेटाकुटीला आलेला समाज !

चर्मकार समाजाने हजारोंच्या संख्येने एकमुख संघटीत होण्याच्या प्रतिज्ञेनेच राष्ट्रीय चर्मकार महासंघाची स्थापना झाली.

**राष्ट्रीय चर्मकार महासंघ**

राष्ट्रीय चर्मकार महासंघ हे पूर्णतः अराजकिय संघटन आहे. आमच्या चर्मकाराच्या व्याख्येमध्ये पूर्वाश्रमीचा अस्पृश्य आणि चर्मोद्योगाशी संबंधित अशा सर्वांचा समावेश होतो.

हरळ्या, ककय्या, कल्याणम्मा, संत रविदास, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज व महर्षी शाहू महाराज आमचे आदर्श असल्यामुळे येथील जाती व्यवस्था मोडून समताधिष्ठित समाज निर्मिती हेच आमचे ब्रीद आहे.

समतेसाठी रचनात्मक संघर्ष हा आमचा नारा असल्याने समग्र चर्मकार समाजाला स्वाभिमान देऊन संघटीत बनविणे व स्वतःच्या न्याय हक्कांसाठी संघटीत करणे हे आमचे कर्तव्य आहे. संत रविदासांना अभिप्रेत असलेले राष्ट्रीय ऐक्य आणि सामाजिक सुधारणा तसेच हरळ्या, कल्याणम्मा यांनी जाती अंतासाठी लढत लढत पत्करलेले हौतात्म्य है आमचे आदर्श आहेत. आमच्या ध्येयाप्रत पोचण्यासाठी राष्ट्रीय चर्मकार महासंघाने जी नवी प्रतिके स्विकारली आहेत. त्यांचा उल्लेख करणे अपिरहार्य आहे.

**अ ) नांव – राष्ट्रीय चर्मकार महासंघ –**

प्रथमतः आम्हाला आमची कुटूंब / गाव / जिल्हा / राज्य / देश येथीलच प्रश्नांवर लक्ष केंद्रीत करावयाचे आहे. देशातील संघटन मजबूत झाल्यावरच त्याची नाळ विविध राज्यातील चर्मकारांच्या प्रश्नांशी जोडता येईल. आम्हाला आमच्या शक्तीची / मर्यादेची जाणीव आहे. तथापि आम्ही विविध राज्यातील चर्मकारांची सुख दुःखे वेळोवेळी जाणून आहोत.

महासंघ हा शब्द आम्ही बौध्द तत्वज्ञानातून घेतला असून भिक्कू संघातील लोकशाही, समता आणि वैज्ञानिक दृष्टीकोन आम्हाला अभिप्रेत आहे.

**ब ) बोधचिन्ह -**

आरी, रापी आणि हस्ती या चर्मकारांच्या पारंपारिक हत्यांराना चक्राकार फिरवून औद्योगिक चक्रामध्ये रुपांतरीत होणारी नक्षी, आम्ही जुने टाकून नवीन तंत्रज्ञानाला, बदलत्या काळाला सामोरे जाऊ इच्छितो असा बोध देते. त्यासाठी वापरलेला निळा रंग डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समतेचे प्रतिक म्हणून पांघरलेला मायेचा मार्गदर्शक आहे.

**क ) ध्वज -**

दोन केशरी रंगांच्या पट्ट्यांमध्ये पांढरा पट्टा असलेले रुंदीच्या दीडपट लांबीचे आणि निळया रंगातील बोधचिन्ह मधोमध आलेले निशाण आमचा ध्वज आहे. वरील केशरी रंग राष्ट्रीय ऐक्यासाठी बलिदान दिलेल्यांचे स्मरण देतो तर तळातील केशरी पट्टा राष्ट्रीय ऐक्यासाठी बलिदानाची प्रेरणा देतो. पांढरा रंग मांगल्याचे, स्वच्छतेचे आणि सुदृढ आरोग्याचे प्रतिक असून त्यामधील बोधचिन्ह आमच्या उद्दीष्टाची आम्हाला सतत आठवण देत राहील.

**ड ) बोधवाक्य-**

मन चंगा तो कठौती मे गंगा हे संतश्रेष्ठ रविदासांचे वचन आम्ही बोधवाक्य निवडलेले असून प्रमाणिक वर्तणूक आणि श्रमप्रतिष्ठा तसेच आळसाला फाटा देऊन हाती घेतेलेले काम निष्ठेने पार पाडण्याचा संदेश देत राहील.

**इ ) सभासदत्व आणि सभासदाची कर्तव्ये -**

पाच रुपये भरुन कोणीही, कोणत्याही कारणाने चर्मोद्योगाशी संबंधित 18 वर्षावरील भारतीय नागरीकास सभासद होण्यासाठी अर्ज करता येईल. तथापि राष्ट्रीय चर्मकार महासघाचे नियम तत्वे व उद्दिष्टे त्यास मान्य असावी लागतील व त्यानुसार त्याने कर्तव्य म्हणून तसे वर्तन करणे बंधनकारक असेल.

(1) राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे सदस्य एक दुसर्‍याबद्दल अत्यंत आपुलकीचा व समन्वयाचा व्यवहार ठेवतील. आपआपसातील कोणत्याही प्रकारचे मतभेद किंवा वाद उत्पन्न झाल्यास सर्वोच्च मंडळाकडे सोपवतील व सर्वोच्च मंडळाचा निर्णय मान्य करतील.

(2) राष्ट्रीय चर्मकार महासंघाने हाती घेतलेला कार्यक्रम जशाचा तसा राबविण्यासाठी तो कटिबध्द असेल.

(3) तो राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या नावाचा वैयक्तिक स्वार्थासाठी तसेच संघटनेची बदनामी होईल अशा कोणत्याही बाबीसाठी वापर करणार नाही.

(4) राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या राज्यातील कोणत्याही सभासदावरील अन्याय अत्याचार हा स्वतः वरील अन्याय आहे असे समजून तो तातडीने कार्यरत होईल व न्याय मागणीसाठी क्रियाशील असेल.

(5) राष्ट्रीय चर्मकार महासंघ हे कलावंत कारागीर व उद्योगशील समूहाचे संघटन असल्यामुळे त्यांच्या कलाकृती, त्यांचे उत्पादन व त्यांचे विविध अविष्कार या बाबत तो अभिमान बाळगेल व त्याचे रक्षण, प्रचार व प्रसार यासाठी परिश्रम येईल.

**ई ) कार्यक्रम**

राष्ट्रीय चर्मकार महासंघ त्याच्या उद्दिष्टाला अनुरुप असा कार्यक्रम दोन टप्प्यांमध्ये राबवू इच्छितो. त्यातील काही कार्यक्रम दीर्घ मुदतीचे असून काही कार्यक्रम ताबडतोब हाती घ्यावयाचे आहेत.

(1) अनुसुचित जाती व अनुसुचित जमातीच्या कुटूंबाना शासनाने जातीचे दाखले घरपोच दिले पाहिजेत व तहसिलदार कार्यालयाकडून होणारा छळवाद व निर्धन माणसाच्या पैशाचा अपव्यय थांबला पाहिजे.

(2) प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी सहकारी तत्वावरील चर्मोद्योग संकुल राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या माध्यमातून उभे करता येईल त्यासाठी शासनाने शेअर भांडवलासाठी अर्थसहाय्य द्यावे. विशेष घटक योजनेचा पैसा सहकारी साखर कारखान्याकडे न वळविता चर्मकाराच्या सहकारी संस्थांना भांडवल म्हणून मिळालाच पाहिजे.

(3) उद्योग धंदयासाठी व असुरक्षिततेच्या भावनेने तालुक्याच्या जिल्ह्याच्या मोठया शहरी स्थलांतरीत होणाऱ्या

अनुसुचित जातीच्या लोकांचे पुनर्वसन झाले पाहिजे. त्यासाठी त्यांच्या सहकारी तत्वावरील गृहनिर्माण संस्थांना शासनाने मोफत जागा दिली पाहिजे.

(4) रस्त्यावरील गरजू गटई कामगारांना तातडीने स्टॉल्स व स्पीच लायसेन्स मिळाले पाहिजे.

(5) चर्मकारांची बहुसंख्य वसाहत असणाऱ्या महानगरातील झोपडपट्ट्यांमध्ये शासनाच्या नवीन गृहबांधणी योजने अंतर्गत इमारत बांधकामास अग्रक्रम देण्यात आला पाहिजे.

(6) देशातील सर्व शहरांमध्ये चर्मकार समाजासाठी सरकारी जागेत समाज मंदिर बांधून ती व्यवस्थापनासाठी चर्मकार समाजाकडे सुपूर्त केली पाहिजेत.

(7) आदिवासी शाळांच्या धर्तीवर अनुसुचित जातीसाठी आश्रमशाळा सुरु केल्या पाहिजेत.

(8) अनुसुचित जाती जमातीच्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीमध्ये महागाई निर्देशांकानुसार वाढ होण्यासाठी तातडीने विचार झाला पाहिजे.

(9) 14 वर्षखालील बूट पॉलिश करणाऱ्या मुलांना अनाथलयामध्ये विनाअट दाखल करुन त्यांच्या कमाईची गरज असणाऱ्या निराधार पाल्यांना उपजिविकेचे साधन उपलब्ध झाले पाहिजे.

(10) सहकारी साखर कारखाने, सहकारी बँका, खाजगी शिक्षण संस्था, येथील नोकऱ्यांध्ये अनुसुचित जातीच्या लोकांना शासकीय नोकरांप्रमाणे राखीव जागेवर नेमणूका दिल्या जात नाहीत त्या दिल्या गेल्या पाहिजेत व तेथील बँकलॉग तातडीने भरला पाहिजे. कायद्याची कठोर अंमलबजाणी झाली पाहिजे.

(11) राष्ट्रीय चर्मकार महासंघ चर्मकारातील जाती पोटजाती मधील विभाजन व विसंवाद टाळण्यासाठी विविध उपक्रम हाती घेऊन त्यामध्ये बंधूत्वाची भवना निर्माण करील.

(12) पैशाचा अपव्यय टाळण्यासाठी हुंडाबंदीसारख्या अनिष्ठ प्रथा टाळण्यासाठी राष्ट्रीय चर्मकार महासंघ सामुदायिक विवाह व आंतरजातीय विवाह यांना प्रोत्साहन देईल.

(13) राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे अंतिम उद्दिष्टय समताधिष्ठीत समाज निर्मिती हेच असल्यामुळे स्वातंत्र्य, समता व न्यायाचा विचार रुजविण्यासाठी नियतकालिकाचे प्रकाशन सुरु करणात येईल व त्याद्वारे संघाची भूमिका व कार्यक्रम समाजापर्यंत पोहोचविण्यात येईल.

(14) साहित्य, कला व पत्रकारिता इत्यादी सांस्कृतिक क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या समाजातील सर्वांना एकत्रित करुन एक व्यासपीठ निर्माण करण्यात येईल व उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्तींचा यथोचित गौरव करण्यात येईल. त्यांना प्रोत्साहन दिले जाईल.

(15) प्रत्येक कुटूंबामध्ये शिक्षण पोचण्यासाठी संघटना सर्व तोपरी प्रयत्न करील. चर्मकार समाजामधील विविध प्रकारच्या शासकीय, निमशासकीय, खाजगी क्षेत्रामध्ये नौकरी करणारे सर्वांचे संघटन करुन त्यांचे प्रश्न व अडीअडचणी सोडविण्यासाठी तसेच त्यांच्याकडील ज्ञान व कर्तृत्वाचा फायदा समाजाला होण्यासाठी एक स्वतंत्र विभाग सुरु करुन या उच्च शिक्षित वर्गाला एकसंघ करेन.

(16) समाजातील शिक्षित व अशिक्षित अशा बेरोजगार युवकांचे संघटन करुन त्यांच्या रोजगारांच्या प्रश्नांसाठी संघटना संघर्ष करील तसेच समाजातील अन्याय, अत्याचारपिडीत बहिण भावांना या युवा संघटनेद्वारे संरक्षण देण्यात येईल. चर्मकार समाजातील निराधार, घटस्फोटीत व तरुण विधवा स्त्रियांचे प्रश्न सोडविण्यासाठी संघटना महिला विभाग बळकट करुन त्यांच्या प्रश्नाला प्राधान्य देईल.

(17) शासनाच्या अनुदानातून राबविण्यात येणारे विविध उपक्रम एक स्वयंसेवी संस्था म्हणून संघटना हाती घेईल व संस्थात्मक पातळीवरील आपली व्याप्ती वाढविल. तसेच समग्र समाजाशी असणारे ऋणानुबंध बळकट करील.

(18) इतर देशातील चर्मकारांच्या संघटनांशी संबंध प्रस्थापित करुन विचारांची देवाण घेवाण करेल व देशामधील सर्वात मोठी लोकसंख्या असणारे (23 टक्के) या उपेक्षित समाज घटकाला सता व संपत्तीमध्ये न्याय वाटा मिळवून देऊन समताधिष्ठित स्वप्न साकार करीन.

## राष्ट्रीय चर्मकार महासंघाची रचना

संघटनेच्या कार्यक्रमाला मूर्त स्वरुप देण्यासाठी संघटनेची रचना सर्व स्तरावरील कार्यकर्त्यांना त्यांच्यातील प्रतिभेला वाव देणारी अशी आहे. प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणावरील संघटनेचे तालुका मंडळे जिल्हा शाखेच्या नियंत्रणखाली काम करेल व जिल्हा शाखा संघटनेच्या सर्वोच्च मंडळाच्या मार्गदर्शनाखाली काम करेल. सर्वोच्च मंडळ हे सर्व जिल्हयाला प्रतिनिधीत्व देणारे असेल व विविध क्षेत्रातील कार्यक्रमासाठी वेळोवळी घ्यावयाची भूमिका निश्चित करण्यासाठी सक्षम असेल.

चर्मकार समाज हा सात्विक व सहनशील आहे. त्याच्या मनामध्ये असणारी अनामिक भिती दूर करुन त्याला स्वाभिमानी व संघर्षशील बनविणे हे आमचे ध्येय असल्याने अधिकाधिक वेळ व श्रम देणा-या कार्यकर्त्यांचे आम्ही स्वागत करतो. समविचारी संघटना व चळवळी यांना आम्ही मित्र मानतो तर समता / स्वातंत्र्याच्या आड येणाऱ्या सर्वांना आम्ही शत्रू समजतो. त्यांच्याशी सनदशीर संघर्ष केल्याशिवाय भारतीय संविधाने दिलेली जीवन प्रणाली साकार होणार नाही, अशीच आमची धारणा आहे.

आमचे या देशावर नितांत प्रेम असल्याने ही भूमी समता, स्वातंत्र्य, न्याय व बंधूता यांची प्रस्थापना करुन आम्ही अधिक सुंदर बनवू इच्छितो.

| | |
|---|---|
| **पंढरीनाथ पवार** | **रविंद्र राजुरकर** |
| **राष्ट्रीय महासचिव** | **राष्ट्रीय प्रवक्ता** |